# गरज असतेच; पण हाव नको !

श्रीरामकृष्ण परमहंस एक कथा सांगत असत. एका बेडकाला एक रुपया सापडला. त्याने तो नेऊन आपल्या बिळात ठेवला. आपल्याजवळ एवढी संपत्ती आहे, त्याचा त्याला इतका गर्व झाला, की काही विचारायची सोय नाही. इतर सर्वांकडे तो अतिशय तुच्छतेने बघायला लागला. एक दिवस एक हत्ती त्याच्या बिळाजवळून जात असताना सारी जमीनच हादरत होती. त्याचा मंडुकरावांना त्रास झाला. बाहेर येऊन त्या हत्तीला लाथ दाखवून ते म्हणाले, ''काय रे ए ! कुणाच्या घरावरून चालला आहेस, जरा सांभाळून जा !''

संपत्तीचा गर्व असाच असतो. ज्याच्याजवळ पैसा असेल त्याला हे सारं जग आपल्या पायाशी लोळण घेत आहे असं वाटत असतं. अर्थात तशी लोळण घेणारेसुद्धा कमी नसतात. असा हा गर्व नुसती संपत्तीच नव्हे; तर सत्ता, कीर्ती, रूप, कला, कौशल्य या साऱ्या बाबतीत होऊ शकतो.

गुणांचा सत्कार करण्यासाठी फूल देण्याची पद्धत आहे. फुलाइतकी सुंदर वस्तू क्वचितच कोठे निर्माण झालेली असेल. असं असूनही आपलं सौंदर्य, सुगंध ते इतक्या सहजपणे अंगावर वागवते, की वागणुकीसाठी तो एक उत्तम आदर्श आहे. इतक्या छोट्याशा जीवनात एवढ्या सौंदर्याची आणि सुगंधाची उधळण दुसरं कोण करू शकणार आहे ? ज्याला हार घातले जातात आणि फुलांचे गुच्छ दिले जातात त्याने थोडे अंतर्मुख होऊन फुलांकडे बघायला शिकलं पाहिजे. इतक्या उत्तम गुणांबद्दल गर्व न बाळगणं हे फुलांकडूनच शिकता येईल.

क्रयशक्तीमुळे पैशाचा जेवढा मोह पडतो, तितका इतर कोणत्याच गोष्टीचा पडत नसावा. त्याचा साठा करण्याने क्रयशक्ती पण कमी व्हायला लागते. सोनं-नाणं-अलंकारांची खरेदी होते. मग जमीन-जुमल्यात पैसा गुंतवला जातो. मग परदेशातल्या बँकांमधून गुंतवणूक होते. खर्च न करता येण्याइतका पैसा साठवून काय समाधान मिळत असेल, ते कळणं फार अवघड आहे. परत तो चोरीला जाऊ नये, धंद्यात खोट येऊ नये याची काळजी असतेच. इतकं सगळं करून तो पैसा ऐन वेळेवर कामी येईल, याची खात्री देता येतच नाही.

पैसा माणसासाठी एक अत्यंत गरजेचं साधन आहे. ते आपल्याला हवं असेल तेवढ्या प्रमाणात योग्य मार्गाने मिळवणं हा एक पुरुषार्थ आहे. पण हवं आणि हाव यामधला फरक आपल्याला जोखता आला पाहिजे. हवं असेल त्याला मर्यादा घालणं आणि हाव निर्माण होऊ न देणं हे नीट साधलं तरच पैसा या साधनाचा पुरेपूर उपयोग होऊ शकतो.

अमेरिकेतल्या एका अब्जाधीशांची ही कहाणी आहे. स्वतःच्या विमानातून सोबत तीन डॉक्टर घेऊन तो एका मीटिंगहून दुसऱ्या मीटिंगसाठी चालला होता. त्याचं विमान म्हणजे हवेत उडणारं एक इस्पितळच होतं. पण त्यातली उपकरणं आणि सोबतचे डॉक्टर यमदूतांचा आलेला घाला परतवू शकले नाहीत. काल्पनिक संपत्तीसाठी देहाच्या संपत्तीची किती ओढाताण करायची याला मर्यादा असतेच.

''कबिरा, यह तन जात है,
राख सके तो राख बटोर,
खाली हाथों वे गये,
जिनके थे लाख करोर !''

---

**– भीष्मराज बाम**

**('मना सज्जना' या पुस्तकातून)**